Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5 | May - 2025

Original Article

# अनुसूचित जातीतील महिला उद्योजक: आर्थिक अडचणी व उपाययोजना

**आढाव ज्योती सुभाष[1], प्रा. डॉ. वाय. एस. टोपरे[2]**
[1]संशोधिका, अर्थशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर
[2]मार्गदर्शक, अर्थशास्त्र विभाग शासकीय ज्ञान, विज्ञान महाविधलाय, छत्रपती संभाजीनगर
**Email:** adhavjyoti23@gmail.com

**Manuscript ID:** JRD -2025-170510
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 5|
Pp. 47-50
May 2025

**Submitted:** 02 Apr. 2025
**Revised:** 12 Apr. 2025
**Accepted:** 23 May. 2025
**Published:** 31 May. 2025

**सारांश:**

*अनुसूचित जातीतील महिलांनी उद्योजकतेच्या क्षेत्रात स्वावलंबन आणि आर्थिक प्रगती साधण्यासाठी मोठा प्रयत्न केला असला तरी त्यांना अनेक आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. भांडवलाचा अभाव, कर्ज प्राप्तीची अडचण, वित्तीय साक्षरतेची कमतरता, शासकीय योजना आणि सहाय्य याबाबतची माहितीचा अभाव, तसेच सामाजिक आणि सांस्कृतिक अडथळे या मुख्य अडचणींचा अभ्यास या शोध निबंधात करण्यात आला आहे. या अडचणींवर मात करण्यासाठी योग्य उपाययोजना, जसे की आर्थिक सल्ला व मार्गदर्शन, प्रशिक्षण कार्यक्रम, शासकीय अनुदाने आणि कर्ज सुविधा यांची गरज अधोरेखित केली गेली आहे. तसेच, महिला उद्योजकतेला चालना देण्यासाठी समाजातील सकारात्मक बदल आणि सहकार्य आवश्यक असल्याचे दिसून आले आहे.*

***की-वर्डस:** अनुसूचित जातीतील महिला उद्योजक, आर्थिक अडचणीं, भांडवल, व्यवसाय, महिलांचे उद्यमशीलता धोरण.*

## प्रस्तावना:

भारतातील अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या प्रक्रियेत महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे ठरते. विशेषतः अनुसूचित जातीतील महिलांनी आपली ओळख उद्योजक म्हणून निर्माण करणे ही केवळ महिलांच्या आत्मसन्मानाची बाब नाही तर समाज बदलाची ही सुरवात आहे. कारण भारतातील लोकशाहीचा पाया म्हणजे समान संधी. मात्र अनेक दशकांपासून अनुसूचित जातीतील महिलांना समाजात दुय्यम स्थान दिले होते. त्यामुळे शिक्षणापासून ते आर्थिक व्यवहारांपर्यंत त्यांचा सहभाग मर्यादित राहिला. तसेच सामाजिक अन्याय आणि भेदभावाचा सामना करावा लागला आहे .तरीसुद्धा या पार्श्वभूमीतून पुढे येत काही महिला आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर स्वत:चा व्यवसाय सुरू करून आपले अस्तित्व निर्माण करत आहेत.

मात्र अनुसूचित जातीतील महिला उद्योजकांना त्यांच्या उद्योजकत्ताच्या प्रवासात अनेक अडथळे येत असतात. विशेषत: आर्थिक अडचणी , कर्ज मिळण्यात येणाऱ्या अडचणी , तसेच भांडवलाची कमतरता, बाजारपेठेची मर्यादा, वित्तीय अडथळे, बँकिंग व्यवस्थेतील अडथळे, नेटवर्किंग, मार्केटिंग, ऑनलाइनचे अडथळे, आर्थिक जागृतीचा अभाव, हे काही ठळक अडथळे आहेत. या सर्व अडथळयांमुळे महिला उद्योजक मागे खेचल्या जातात. भारतातील महिला उद्योजक आर्थिक आणि सामाजिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरते. 2023-24 च्या Global Entrepreneurship Monitor (GEM) अहवालानुसार महिला उद्योजकतेची सुरुवात दर 2021 ते 2023 मध्ये 10.4% वर पोहोचला आहे. जी 2001 ते 2005 च्या सरासरी 6.1% पेक्षा लक्षणे वाढ आहेत.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/

**Address for correspondence:**
*आढाव ज्योती सुभाष, संशोधिका, अर्थशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर*

DOI:10.5281/zenodo.15709165
OPEN ACCESS

**How to cite this article:**
*आढाव,. ज्योती. सुभाष., & टोपरे,. वाय . एस. (2025). अनुसूचित जातीतील महिला उद्योजक: आर्थिक अडचणी व उपाययोजना. Journal of Research & Development, 17(5), 47–50.* https://doi.org/10.5281/zenodo.15709165

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-5 | May - 2025

तसेच भारतातील महिला उद्योजकतेची सध्याची स्थिती मध्ये 2020 ते 31 जानेवारी 2024 या वर्षांमध्ये भारतात एकूण 22.82 लाख एम. एस. एम. इ. (MSME) पैकी 20.5% (4.67 लाख) उद्योग हे महिला मालिकेचे होते. या महिला उद्योजकांनी एकूण रोजगाराच्या 18.73% (2.84 कोटी व्यक्ती) रोजगार निर्माण केला. तसेच एकूण गुंतवणुकीत 11.15% आणि एकूण उलाढालीत 10.22% योगदान दिले आहे. यामध्ये अनुसूचित जातीतील महिला उद्योजकांचा वाटा ही लक्षणीय आहे .परंतु अद्यापही त्यांना विविध आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. महाराष्ट्रातील महिला उद्योजकांचा विचार करता 2022-23 च्या एम. एस. एम. इ. (MSME)अहवालानुसार राज्यात सुमारे 12.5% व्यवसाय महिला मालकीचे आहेत. तथापि अनुसूचित जातीतील महिला उद्योजक च्या आकड्यांमध्ये समावेश कमी आहे. ज्यामुळे त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी विशेष धोरणात्मक हस्तक्षेप आवश्यक आहे.

"स्टँड-अप इंडिया" योजने अंतर्गत 2016 पासून 2023 पर्यंत 1.80 लाख उद्योजकांना कर्ज मंजूर करण्यात आले. ज्या मध्ये 80% पेक्षा अधिक लाभार्थी महिला उद्योजक आहेत. ही योजना अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीतील महिला उद्योजकांना व्यवसाय सुरू करण्यासाठी कर्ज उपलब्ध करून देते. अनुसूचित जातीतील महिला उद्योजकांना भेडसावणाऱ्या आर्थिक अडचणींचा सखोल अभ्यास करून. त्या अडचणी दूर करण्यासाठी उपाय योजना सुचवणे हे या संशोधनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्यामुळे अनुसूचित जातीतील महिला उद्योजकांचे आर्थिक सक्षमीकरण साधता येईल आणि समाजातील समानतेचा पाया मजबूत होईल.

**उद्दिष्टे:**
1. अनुसूचित जातीतील महिला उद्योजकांच्या आर्थिक अडचणींचा अभ्यास करणे.
2. अनुसूचित जातीतील महिला उद्योजकांना अडचणी का निर्माण होतात याची कारण समजून घेणे.
3. महिला उद्योजकांच्या आर्थिक अडचणी वर उपाययोजना व शिफारशी सुचवणे.
4. अनुसूचित जातीतील महिलांच्या उद्योजकतेस चालना देण्यासाठी आवश्यक धोरणात्मक उपाय मांडणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम आधार सामग्रीचा वापर केला असून त्यामध्ये विविध शोध निबंध, लेख, संकेत स्थळे, नियतकालिके, मासिके, वर्तमानपत्रे, संदर्भ ग्रंथ, विविध अहवाल व इंटरनेटचा आधार घेण्यात आला आहे.

**अनुसूचित जातीतील महिला उद्योजकांच्या आर्थिक अडचणी:**

1. **कर्ज मिळवण्यात अडचणी**: अनुसूचित जातीतील महिला उद्योजकांना व्यवसाय करण्यासाठी कर्जाची अत्यंत गरज भासते व कर्ज वेळेत मिळवणे हे एक महत्त्वाचे आव्हान ठरते. कारण बँका आणि वित्तीय संस्था कर्ज देताना खूप कठोर निकष ठेवतात. त्यामुळे महिलांना कर्ज मंजूर होणे कठीण होते. तसेच आर्थिक स्थैर्य किंवा कर्ज परतफेडीची हमी न देता येण्यामुळे त्यांना कर्ज देण्यास तृप्ती मिळत नाही. कर्जासाठी लागणारे कागदपत्रांची किचकट प्रक्रिया व उच्च व्याजदर या कारणांमुळे ही महिलांना कर्ज मिळण्याचा मार्ग कठीण होतो. यामुळे महिला उद्योजकांना आवश्यक असणारे भांडवल वेळेवर न मिळाल्यामुळे त्यांच्या व्यवसायामध्ये अडचणी मोठ्या प्रमाणात येतात.

2. **भांडवलाचा अभाव व भांडवली समस्या:** अनुसूचित जातीतील महिला उद्योजकांमध्ये व्यवसाय सुरू करताना सर्वात मोठी अडचण म्हणजे आवश्यक असणारे सुरुवातीचे भांडवल उभारणे. बऱ्याचदा महिलांकडे स्वत:चे काही बचत किंवा मालमत्ता नसल्यामुळे त्यांना उद्योगात स्वत:हून भांडवल उभे करता येत नाही. तसेच कुटुंबियांचा मानसिक किंवा आर्थिक पाठिंबा नसणे, हे देखील एक महत्त्वाच कारण ठरते. तसेच कार्यरत भांडवल (Working Capital) जसे की कच्चा माल, खरेदी, मजुरी, उत्पादन खर्च, विपणन इत्यादी साठी लागणारे पैसे नियमितपणे उपलब्ध न होणे; हे एक मोठे भांडवली आव्हान आहे. त्यामुळे त्यांच्या व्यवसायाचा नियमित प्रवाह बिघडतो. याशिवाय दीर्घकालीन गुंतवणूक (Long-Term Capital) जसे की यंत्रसामग्री खरेदी, तंत्रज्ञान उन्नती, साठवणूक सुविधा, यासाठी लागणारे भांडवल उभारणीही अवघड ठरते. भांडवली व्यवस्थापनाची माहिती, आर्थिक नियोजन आणि निधीचे स्रोत; यांची माहिती नसल्यामुळे अनेक महिला उद्योजक आर्थिक निर्णय घेताना अडचणीत येतात. त्यामुळे त्यांच्या व्यवसायाच्या वाढीचा वेग कमी होतो किंवा व्यवसाय बंद पडण्याची शक्यता वाढते. या समस्या केवळ आर्थिक नव्हे तर संरचनात्मक स्वरूपाच्या आहेत आणि त्यासाठी विशेष मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि सुलभ कर्ज प्रणालीची गरज आहे.

3. **वित्तीय साक्षरतेचा अभाव:** अनुसूचित जातीतील महिला उद्योजकांसाठी एक गंभीर अडचण म्हणजे वित्तीय साक्षरतेचा अभाव. व्यवसाय चालवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मूलभूत आर्थिक संकल्पना - जसे की खर्चाचे नियोजन, नफा-तोट्याचे आकलन, बँकिंग व्यवहार, कर्ज प्रक्रियेची समज, कर व्यवस्थापन आणि गुंतवणुकीचे पर्याय - याबाबत या महिलांमध्ये पुरेशी जागरूकता नसते. त्यामुळे त्या आर्थिक निर्णय घेताना गोंधळतात किंवा इतरांवर अवलंबून राहतात.

शासकीय योजना, अनुदान, कर्ज सवलती, उद्योग प्रशिक्षण व सल्ला सेवा यांसारख्या महत्त्वाच्या सुविधांबाबत अपुरी माहिती असल्याने त्या या संधींचा पुरेपूर उपयोग करू शकत नाहीत. अनेक वेळा महिलांना या योजनेचा फॉर्म भरणे, अर्ज सादर करणे किंवा त्यासाठी लागणारी कागदपत्रे गोळा करणेही अवघड जाते. याशिवाय, डिजिटल व्यवहारांची अपरिचिती आणि तांत्रिक ज्ञानाचा अभाव यामुळे सध्याच्या स्पर्धात्मक अर्थव्यवस्थेत त्या मागे पडतात.

यामुळे आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता, नियोजन, नफ्याचा योग्य उपयोग आणि जोखमीचे व्यवस्थापन करता न आल्याने, व्यवसाय योग्य पद्धतीने चालवता येत नाही. म्हणूनच वित्तीय साक्षरतेचे प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि सतत अद्ययावत माहिती देणारी प्रणाली ही अत्यावश्यक बाब बनते.

4. **शासकीय योजना आणि सुविधांचा मर्यादित लाभ:** अनुसूचित जातीतील महिला उद्योजकांसाठी केंद्र व राज्य शासन अनेक योजनांचा लाभ उपलब्ध करून देते, जसे की मुद्रा योजना, प्रधानमंत्री रोजगार सृजन योजना (PMEGP), स्टँड-अप इंडिया, महिला अर्थसहाय्य योजना, आणि दलित उद्योजकांसाठी विशेष प्रोत्साहन योजना. तथापि, या योजना जरी अस्तित्वात असल्या तरी त्यांचा प्रत्यक्ष लाभ या महिला उद्योजकांपर्यंत पोहोचताना अनेक अडथळे येतात.

प्रथम, योजनेची माहिती योग्य पद्धतीने व वेळेवर मिळत नाही, विशेषतः ग्रामीण भागातील महिलांना. दुसरे म्हणजे, पात्रतेची निकष, अर्ज प्रक्रिया, लागणारी कागदपत्रे, ऑनलाईन पद्धतीचा वापर - हे सर्व तांत्रिक बाबी असून त्याचे ज्ञान नसल्यामुळे या योजना महिलांसाठी दुर्बोध वाटतात. तिसरे म्हणजे, स्थानिक अधिकारी, बँका आणि सहाय्यक संस्था यांच्याकडून सहकार्याचा अभावही या अडचणीला कारणीभूत ठरतो.

त्याशिवाय, अनेक वेळा महिला सामाजिक दबावाखाली असतात आणि पुरुषप्रधान व्यवस्थेमुळे त्या पुढे येण्यास संकोच करतात. त्यामुळे योजनांचा उपयोग होण्याऐवजी त्या केवळ कागदावरच मर्यादित राहतात. यावर उपाय म्हणून योजनांची जागरूकता वाढवणे, प्रक्रिया सुलभ करणे, स्थानिक पातळीवर मार्गदर्शन केंद्र उभारणे आणि 'हँडहोल्डिंग सपोर्ट' देणे हे अत्यंत आवश्यक ठरते.

5. **व्यवसायासाठी आवश्यक संसाधनांची कमतरता:** अनुसूचित जातीतील महिला उद्योजकांना त्यांच्या व्यवसायासाठी आवश्यक मूलभूत संसाधनांमध्ये कमतरता भासत असते, ही एक मोठी अडचण आहे. व्यवसाय उभारण्यासाठी आणि चालवण्यासाठी लागणाऱ्या गोष्टी - जसे की योग्य जागा, यंत्रसामग्री, तांत्रिक सहाय्य, कच्चा माल, वितरण यंत्रणा आणि विपणन साधने - या अनेकदा सहज उपलब्ध होत नाहीत.

विशेषतः ग्रामीण भागातील महिला उद्योजकांना दर्जेदार तांत्रिक प्रशिक्षणाची आणि व्यवसाय कौशल्याचीस संधी कमी मिळते. त्यामुळे त्या व्यवसायातील नवीन तंत्रज्ञान, प्रक्रियात्मक सुधारणा, किफायतशीर उत्पादन आणि डिजिटल मार्केटिंग यांसारख्या महत्त्वाच्या बाबतीत मागे राहतात. शिवाय, कधी-कधी भाड्याने घेतलेली जागा, विद्युत पुरवठा, पाणी पुरवठा, वाहतूक सुविधा यांचा अभावही त्यांच्या उत्पादन प्रक्रियेला अडथळा निर्माण करतो.

बाजारपेठ पर्यंत पोहोचण्याच्या मार्गातही अडथळे येतात. त्यांना - उत्पादने कशी विकावी, कोणत्या बाजारपेठांमध्ये संधी आहेत, ग्राहकांशी संवाद कसा साधावा, याची माहिती आणि संपर्क उपलब्ध नसतो. परिणामी, त्यांच्या उत्पादनांना मागणी असूनही विक्री करताना अडचण येते. त्यामुळे संसाधनांचे नियोजन, सुविधा केंद्रांची स्थापना आणि व्यावसायिक सल्लागारांची उपलब्धता हे उपाय अत्यावश्यक ठरतात.

6. **सामाजिक व सांस्कृतिक अडथळे:** अनुसूचित जातीतील महिला उद्योजकांना आर्थिक अडचणींबरोबरच सामाजिक आणि सांस्कृतिक अडथळयांनाही तोंड द्यावे लागते. पुरुषप्रधान समाज व्यवस्थे मध्ये महिलांची व्यवसाय क्षेत्रातील उपस्थिती अद्यापही मर्यादित आहे. अनेकदा त्यांना "व्यवसाय हा पुरुषांचा प्रांत आहे" असे ठरवले जाते, आणि त्यामुळे त्यांना कौटुंबिक पाठिंबा मिळत नाही. काही वेळा नवरा, सासरचे लोक किंवा समाजातील इतर मंडळी व्यवसाय करण्यास विरोध करतात, ज्यामुळे महिलांना मानसिक दडपणाखाली काम करावे लागते.

याशिवाय, घरातील जबाबदाऱ्या - जसे की मुलांची देखभाल, स्वयंपाक, वयो-वृद्धांची सेवा - या सर्व जबाबदाऱ्या महिलांवरच असल्यामुळे त्यांना व्यवसायासाठी आवश्यक वेळ आणि उर्जा मिळत नाही. सार्वजनिक ठिकाणी जाणे, पुरूषांशी व्यवहार करणे, बँकेत जाणे किंवा प्रशिक्षण कार्यक्रमांना उपस्थित राहणे या बाबतीतही समाजात अजूनही अनेक बंधने आहेत.

या सामाजिक मर्यादा आणि रूढी महिलांमध्ये आत्मविश्वासाची कमतरता निर्माण करतात. त्यामुळे कितीही इच्छा असूनही त्या उद्योजकतेकडे वळू शकत नाहीत किंवा अर्धवट थांबतात. त्यामुळे मानसिक समुपदेशन, कौटुंबिक सहभाग आणि महिलांसाठी स्वतंत्र प्रशिक्षण व आधार प्रणाली निर्माण करणे अत्यावश्यक आहे.

**अनुसूचित जातीतील महिला उद्योजकांच्या आर्थिक अडचणींवरील उपाययोजना:**

**1. सुलभ व सवलतीचे कर्ज पर्याय:**

महिलांना व्यवसायासाठी भांडवल मिळावे यासाठी बँकांनी व शासकीय संस्थांनी सुलभ, किमान कागदपत्रे असलेले आणि कमी व्याजदराचे कर्ज पर्याय उपलब्ध करून द्यावेत. "स्टँड-अप इंडिया", "मुद्रा योजना" यासारख्या योजनांचा प्रसार ग्रामीण भागात सक्रियपणे करणे आवश्यक आहे. महिला बचत गटांमार्फत सामूहिक कर्जपुरवठ्याचे मॉडेल तयार करणे हेही फायदेशीर ठरू शकते.

**2. व्यवसाय प्रशिक्षण व वित्तीय साक्षरतेसाठी कार्यशाळा:**

महिलांना व्यवसाय व्यवस्थापन, बँक व्यवहार, आर्थिक नियोजन, डिजिटल पेमेंट आणि करप्रणाली याबाबत प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. स्थानिक पातळीवर नियमित प्रशिक्षण शिबिरे, ऑनलाईन कोर्सेस आणि मार्गदर्शन केंद्रे सुरू करणे आवश्यक आहे.

**3. मार्गदर्शन व मेंटॉरशिप सल्ला सुविधा:**

महिला उद्योजकांना सुरुवातीपासून व्यवसाय वाढीपर्यंत सतत मार्गदर्शन मिळावे यासाठी अनुभवी उद्योजक, NGO किंवा महिला विकास मंडळाच्या माध्यमातून "मेंटॉर-उद्योजक" उपक्रम सुरू करता येतील. यामुळे महिलांचा आत्मविश्वास वाढतो आणि अडचणी सोडवण्याची क्षमता विकसित होते.

**4. संसाधन केंद्रांची स्थापना:**

ग्रामीण व आदिवासी भागात 'व्यवसाय सुविधा केंद्र' (Business Facilitation Centers) स्थापन करून त्याठिकाणी जागा, यंत्रसामग्री, प्रशिक्षण, विपणन सहाय्य आणि स्टोरेजची सोय केली जावी. या ठिकाणी महिलांना सामायिक वापरासाठी सुविधा मिळाल्यास त्यांचा खर्च कमी होईल व व्यवसाय टिकवता येईल.

**5. प्रसारमाध्यमांद्वारे जनजागृती व सशक्तीकरण:**

शासकीय योजनांची माहिती, यशोगाथा, प्रशिक्षणाच्या संधी आणि नवीन तंत्रज्ञान यांची माहिती रेडिओ, टीव्ही, स्थानिक वृत्तपत्रे व सोशल मीडियाद्वारे पोहोचवावी. तसेच, महिला मेळावे, औद्योगिक प्रदर्शनामधून नेटवर्किंग वाढवावे.

**6. सामाजिक परिवर्तन आणि कुटुंबीयांचा सहभाग:**

महिला उद्योजकता ही कुटुंबासाठी आणि समाजासाठी सकारात्मक गोष्ट आहे हे पटवून देण्यासाठी जनजागृती मोहीम राबवावी. पती, कुटुंबीय, ग्रामपंचायत प्रतिनिधी आणि स्थानिक नेत्यांचा सकारात्मक सहभाग असावा यासाठी विशेष प्रयत्न व्हावेत.

**निष्कर्ष:**

अनुसूचित जातीतील महिला उद्योजकता ही सामाजिक व आर्थिक परिवर्तनाची शक्तिशाली प्रक्रिया आहे. परंतु आजही या महिलांना उद्योजकतेच्या प्रवासात अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. भांडवलाचा अभाव, वित्तीय साक्षरतेची कमतरता, शासकीय योजनांबाबत माहितीचा अभाव, संसाधनांची अपुरी उपलब्धता आणि सामाजिक-सांस्कृतिक अडथळे या प्रमुख आर्थिक समस्या आहेत, ज्या त्यांच्या व्यवसाय वृद्धीमध्ये अडथळा निर्माण करतात.

या अडचणींवर मात करण्यासाठी शासन, स्वयंसेवी संस्था, बँका आणि समाज यांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. विशेष सवलतीच्या कर्ज योजना, वित्तीय व उद्योजकीय प्रशिक्षण, महिला सक्षमीकरण कार्यक्रम, आणि सामाजिक मानसिकतेत सकारात्मक बदल घडवणे, या गोष्टी केल्या गेल्यास अनुसूचित जातीतील महिला स्वत:चा व्यवसाय यशस्वीरित्या सुरू करू शकतील आणि आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनतील. या संशोधनातून हे स्पष्ट होते की, योग्य दिशा, संधी आणि सहकार्य मिळाल्यास अनुसूचित जातीतील महिला उद्योजक देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी एक सशक्त आधारस्तंभ ठरू शकतात. त्यामुळे त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर ठोस उपाययोजना राबवणे ही काळाची गरज आहे.

**संदर्भ:**

1. Deshpande, R. S. (2014). Dalit Women in India: Issues and Perspectives. New Delhi: Rawat Publications.
2. Maharashtra Government, Directorate of Industries. (n.d.). Women Entrepreneurs Schemes and Policies. Retrieved May 2025, from https://www.mahaindustry.gov.in
3. National Commission for Scheduled Castes. (n.d.). Socio-Economic Report of Scheduled Castes. Retrieved May 2025, from https://www.ncsc.nic.in
4. Patil, S. M. (2020). Anusuchit Jati Til Mahila Ani Swavalamban [Scheduled Caste Women and Self-Reliance]. Pune: Prakashan Vibhag.
5. Planning Commission of India. (2013). Report on Socio-Economic Development of Scheduled Castes. New Delhi: Government of India.
6. Sudarshan, R. M. (2010). Empowerment of Women through Entrepreneurship. Journal of Social Development Studies, 8(2), 45–56.
7. MSME Ministry, Government of India. (n.d.). Entrepreneurship Development Program Report. Retrieved May 2025, from https://www.msme.gov.in
8. Vikaspedia. (2023). SC Women Entrepreneurship Schemes. Retrieved May 2025, from https://www.vikaspedia.in